

## शेतमजूर परिषद —

# शेतमजूर स्त्रिया कंबर कसून उभ्या रहाणार !

दिनांक १५ नोव्हेंबर ७८. बारामतीचा सांस्कृतिक हॉल ! इतर वेळेला इथं नाटकं होतात, तमाशे होतात. १५ तारखेला मात्र महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्ह्यातून आलेल्या दलित, सवर्ण, आदिवासी शेतमजूरांनी हॉल गच्च भरला होता. बहुतेक सभामध्ये बायांची उपस्थिती अगदी थोडी उगाच नावापुरती असते. या परिषदेला मात्र बायांची संख्या फार मोठी होती. ही परिषद महाराष्ट्र राज्य भूमिहीन शेतमजूर परिषदेने आयोजित केली होती.

**विजेची झिलई, पाण्याची मलई यात वाटा कुणाचा !**

महाराष्ट्राच्या हजारो खेड्यांमध्ये आज शेतमजूर वर्ग आहे. एकीकडे असं दिसतं की सधन शेतकरी दिवसेदिवस आधिकाधिक सधन होतो आहे. उसातून मिळालेल्या पैशातून बंगले, माड्या, फटफट्या येताहेत. सधन शेतकऱ्याची शहरात सिनेमागृहे होत आहेत. आणि दुसरीकडे ज्याच्या कष्टावर उसातून पोत्यानं पैसा मिळतो तो शेतमजूर आपल्या झोपडीचे पाचट सुद्धा दरवर्षी वदलू शकत नाही. जमिनीविषयक सुधारणा कायदे नगारा वाजवत आले आणि प्रत्यक्षात जमिनीवरून हाकलला जाउन छोटा शेतकरी भूमिहीन शेतमजूर बनला. देशात समृद्धी आणि संपन्नतेसाठी नैसर्गिक संपत्तीचा योग्य तो वापर करून घेण्यासाठी कष्टकरी वर्गाच्या खिशातून कराच्या रूपाने गोळा केलेल्या पैशातून धरणाच्या योजना शासनाने आणल्या. धरणाच्या पाण्याचा फुगवटा होणार म्हणून गावच्यागावं उठवली, जमीनी धरणासाठी घेतल्या आणि प्रत्यक्षात नुकसानभरपाई दिली भीक घातल्यासारखी, पुनर्वसन तर नीट झालेच नाही. जमिनीला पर्यायी जमीन नाही. अनेक धरणग्रस्त कुटुंबे आज दैन्यावस्थेत आहेत. द्राक्षाचे आणि उसाचे मळे उठविणाऱ्यांचीच सत्ता असल्याने आज या गरीब शेतकऱ्यांकडे, भूमिहीनां-

कडे, शेतमजूरांकडे शासनाचे लक्ष कसे जाईल? किमान वेतनाचे कायदे होतात. पुरोगामीत्व आहे ते कायदा करण्यापुरतं किमानवेतनाच्या अमलबजावणी-कडे मात्र लक्ष नाही.

ग्रामीण भागातल्या जनतेचे आज असंख्य प्रश्न आहेत. १२ महिने रोजगार नाही, मजुरी अपुरी, घरे नाहीत, कर्जाचा बोजा, मुलांना शिक्षण नाही. आजा शेतमजूर, बाप शेतमजूर, मुलगा शेतमजूर! एक भीषण चक्र सतत चालू आहे. आणि या सर्वांचा बहुसंख्येने शेतमजूर असलेल्या स्त्रियांवर नक्कीच परिणाम होतो. समान वेतनाचा कायदा आला तरी बाईला रोज कमी आहेच. या सर्व भीषण जीवनाचा अनुभव ही स्त्री घेत असते. त्यामुळे शेतमजूर परिषदेला स्त्रिया मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या. भोर, पुणे शहरातल्या कामगारांनी १५-१५ दिवसाच्या रजा काढून आपल्या या ग्रामीण दोस्ताला उभे करण्यासाठी जाणीवपूर्वक धडपड केली.

या परिषदेची तयारी करण्यासाठी, त्याचप्रमाणे परिषदेमध्ये स्त्रियांनी दडपण मोडून सहभागी व्हावे म्हणून अनेक स्त्री कार्यकर्त्या ८।१० दिवसापासून बारामतीच्या आसपासच्या गावात, उसाच्या मळ्यावर हिंडत होत्या. हे गाव मुख्यमंत्र्याचं म्हणून परिषद या गावी घेतलेली नव्हती तर आज सरकारच्या असंख्य योजनांचा फायदा घेऊन फुगलेल्या भांडवली शेतकऱ्यांच्या बालेकिल्ल्यात स्त्री-पुरुष शेतमजूरांवरचं दडपण दूर व्हावे, त्यांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव व्हावी म्हणून परिषद बारामतीत घेतली गेली. भोरहून जोत्स्ना, इंदुताई माळी ओल्हाटबाई, सांगलीहून गीता ठाकर या रात्रंदिवस बागाईतदारांच्या दमदाटीला न जुमानता ऊसमळ्यावर जात होत्या, बायकांशी बोलत होत्या. मुंबईहून छाया दातार व अमोल दिघे आल्या होत्या. गेली २०।३० वर्षे दबलेले दुःख, सहन केलेली दडपशाही याबद्दल बायका बोलत होत्या. जाचकांचा मळा मोठा वाहे. ते क्रिकेटसाठी ट्रॉफी ठेवतात, पिक्चरमध्ये पैसा गुंतवतात आणि त्यांच्या शेतावरचे २५-२५ वर्षे राबणारे मजूर बघा...

बाई सांगत होती... "२५ वर्ष इथच या शेतात राह्यलो, १० पैसे रोज होता तो २५ वर्षान १॥ रु. झाला आहे. मालकाची माडी उठली पण माझी झोपडी आहे तशीच आहे. रोज पण वाढवून देईनात म्हणून युनियनकडं गेलो तर झटक्यात काम बंद केलं नी जागा खाली करा म्हणले, खाली माना घालून राबत होतो तोवर आमची अडचण वाटली नाही. आम्ही काइ हालना, तवा पोरावर नारळ चोरल्याचा खोटा आळ घेतला. आओ माजी सात बी पोरं याच मळ्यावर जलमली वाडली बी इथच, आनि आताच त्याला नारळ चोरायची बुद्धी व्हईल का? पगार वाढवून द्या म्हटलं म्हणून ही थेरं चाललीत मालकाची!"

प्रत्येक वस्तीवर परिषदेची माहिती देणाऱ्या कार्यकर्त्यांना हाच अनुभव येत होता. सधनांच्या वाढत्या दडपशाहीला तोंड दिलं पाहिजे असं बायकांना मनोमन वाटत होते.

एक ५० वर्षाची शेतमजूर स्त्री म्हणाली,

"बायाच एक होत नाहीत." वृद्धत्वाकडे झुकू लागलेल्या, अनेक जिर्ण सनातन संस्कार घेतलेली ही बाई म्हणाली," आज पितर जेवायला घालायची होती. पण पितर काय, येतील पुढच्या वर्षाला, मजुरीचा प्रश्नच बिकट हाय ... पितर घालण्यात वेळ घातला तर कसं होईस?" पाप पुण्य, कर्म या सगळ्याची भीती सोडून ती बाई वस्तीवरच्या मिटींगला आली.

परिषदेला नगर, सातारा, नाशिक, पुणे, कोल्हापूर या जिल्ह्यातल्या बागायती भागातल्या शेतमजूर स्त्रिया आल्या होत्या. धुळे जिल्ह्यातून आदिवासी शेतमजूर स्त्रिया आल्या होत्या. किमान वेतनाच्या अमलबजावणीच्या लढ्यात आघाडीवर असलेल्या भुरीबाईने बायकांवर हात टाकणाऱ्याची धिंड कशी काढली ते सांगितले. कोल्हापूर जिल्ह्यातुत पर्यायी जमीन द्या, तोपर्यंत गाव उठवून देणार नाही म्हणून सत्याग्रह केलेल्या गरीब शेतकरी होत्या. ७२ च्या दुष्काळात शासनावर दडपण आणून सत्याग्रह करणाऱ्या, दुष्काळात रोजगार मिळ-

वलेल्या स्त्रिया होत्या.

महाराष्ट्रातल्या बऱ्याच संघटना सहभागी झालेल्या या परिषदेतील कार्यकर्त्यांनी आपल्या भाषणात स्त्रियांच्या प्रचंड उपस्थितीचा, आज सर्वत्र चाललेल्या लढ्यातील सहभागाचा गौरवाने उल्लेख केला. परिषदेमध्ये स्त्रियांचे सामाजिक प्रश्न आले नाहीत कारण प्रामुख्याने आर्थिक मागण्यासाठी ही परिषद होती. पण स्त्रीवर पडणाऱ्या दुहेरी कामाचा बोजा, तिची निरक्षरता याची नोंद ही परिषद घेत होती. पुण्याहून ४० च्या संख्येने आलेल्या म्युनिसिपल कामगार स्त्रियांच्या प्रमुख कार्यकर्त्या ताराबाईंनी आपले संघटना बांधणीचे नी लढ्याचे अभनुव सांगितले.

परिषदेत किमान वेतन, धरणग्रस्तांचे पुनर्वसन, रोजगार हमी, जमिनीचे फेरवाटप या ठरावाबरोबरच मराठवाडा विद्यापीठाला आंबेडकरांचे नाव दिले पाहिजे, हे ठराव मांडण्यात आले.

महाराष्ट्रातल्या पुरोगामी लोकशाही आघाडीने सत्तेवर आल्यावर ४० कलमी आश्वासने दिली. यात स्त्रियांच्या संबंधीही आश्वासने होती. आज स्त्रिया समाजाचा फार मोठा वर्ग आहे. कित्येक ठिकाणी किमान वेतन देण्यास टाळाटाळ केली जाते. ज्यावेळी या विरुद्ध लढा उभा केला जातो त्यावेळी लाठ्या आणि काठ्याच मिळतात. किमान आणि समान वेतनाचे कायदे होऊनही अमलबजावणी होत नाही. या सर्वांचा शेतमजूर स्त्री दररोज अनुभव घेत असते. त्यामुळे हा ठराव मांडला गेल्यावर शेतमजूरांचे लढे उभे राहिले पाहिजेत हे वाक्य ऐकल्यावर स्त्रियांनी हात उंचावून आपला पाठिंबा व्यक्त केला. रोजगार हमी योजनेवरील ठरावालाही असाच पाठिंबा मिळाला. कारण ५ मलाच्या आत काम मिळेलच याची शाश्वती नाही. आणि मिळाले तर दररोज २।३ मैल चालत तरी जायचे किंवा कामावरच रहायला जायचे. एका झोपडीचे पाचट बदलता येत नाही तर कामाच्या ठिकाणी कुठला निवारा उभा करणार? कामाच्या ठिकाणी उन्हात खडी फोडताना घोटभर पाणीसुद्धा मिळत नाही. जेवायला झाड असेल तर सावली नाही. तर झीट आणणाऱ्या उन्हातच दोन घास खाऊन घ्यायचे. रोजगार हमी योजनातील या त्रुटी ऐकताना बायका 'खरच हाय सगळं !' म्हणून एकमेकीला डोळ्यांनीच सांगत होत्या. जमिनीचे फेरवाटप झाले पाहिजे या ठरावाला चांगलाच प्रतिसाद बायकांनी दिला. विशेषतः दलित स्त्रियांशी बोलताना हे जाणवत होते. जमिनीचा तुकडा मिळाला की जमीनदारांवर अवलंबून रहायला नको की सरकारवर ! सरकारकडून भांडून कालव्याच पाणी, अवजारं आदी गोष्टी मिळवता येतील पण प्रथम पायावर उभं तरी रहाता येईल !

ठरावाच्या निमित्ताने झालेल्या चर्चेतून शेतमजुरांच्या, गरीब शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढे झाले पाहिजेत असे शेतमजूर स्त्रियाही सांगत होत्या. शहरातल्या कामगारवर्गाच्या प्रतिनिधींनी ग्रामीण भागातल्या शेतमजूरांना आपला पाठिंबा व्यक्त केला. माण भागातल्या एका बाईनं हे फार अर्थपूर्ण शब्दात व्यक्त केलं, " ज्याचं जळतं त्याला कळतं... कामगार आणि आमी भावाभावावाणी हाय ! हा कामगार भाऊच धावून येनार !" २००।२०० मैलावरुन नवरा रागवला तरी काहीजणी आल्या होत्या. या सर्व स्त्रियांना ओढ दिसली की आपल्या हक्कासाठी केव्हा लढायचं, केव्हा मोर्चा निघणार? आता कंबर कसूनच बारामतीतनं बाहेर पडायचं आणि स्त्री-मुक्तीच्या गाण्याप्रमाणे 'त्याना पालथं पाडून हात घशात घालून' गेलं समदं ते मिळवाया जायचं' असा निर्धार करून स्त्रिया घरोघरी गेल्या.

या शेतमजूर परिषदेतील स्त्रियांचा सहभाग वाढत्या जागृतीचे लक्षण आहेच पण स्त्री-मुक्ती चळवळीचे एक नवे वळणही सूचीत करतो.

— बायजा प्रतिनिधी